BG Tupe

ISSN 0976-9056

**SPECIAL ISSUE**

**AUGUST- 2013**

Not found

SOCIETY OF TRAINING AND RESEARCH MANAGEMENT AURANGABAD

STAR-M

**SOCIETY OF TRAINING AND RESEARCH MANAGEMENT**
**AURANGABAD (M.S.)**



# Invitation

Pravara Rural Education Society's

## Padmashri Vikhe Patil College of Arts, Science and Commerce,

Pravaranagar, At./Po. Loni, Tal:Rahata, Dist: Ahmednagar

Re-Accredited by NAAC at 'A' Grade with CGPA 3.61 out of 4
College with Potential for Excellence
ISO 9001: 2008 Certified & Recipient of Best Rural College Award

**Solicits your gracious presence at the**

# INAUGURAL FUNCTION

**OF**

# NATIONAL SEMINAR

**ON**

# 'CHALLENGES BEFORE INDIAN ECONOMY'

**(Sponsored by University Grants Commission, New Delhi)**

**On Saturday 17th August, 2013 at 10.00 am**

### Chief Guest

**Hon'ble Prof. Sukhadeo Thorat,**
Former Chairman, University Grants Commission, New Delhi
Chairman, Indian Council of Social Sciences Research, (ICSSR) New Delhi

### President

**Hon'ble Padmabhushan Shri.Balasaheb Vikhe Patil**
Former Minister for Heavy industries (Govt.of India) and
Chairman, Pravara Rural Education Society, Pravaranagar

### Guest of Honour

**Hon'ble Dr.Y.K. Alagh**
Former Minister, Power, Planning, Science and Technology, GOI
Chancellor, Nagaland University
Chairman, Institute of Rural Management Anand

**Hon'ble Shri.Radhakrishna Vikhe Patil (MLA)**
Minister for Agriculture and Marketing (Govt. of Maharashtra)
Trustee, Pravara Rural Education Society, Pravaranagar

**Hon'ble Shri.Rajendra Vikhe Patil**
Secretary General, Pravara Rural Education Society, Pravaranagar
Senate Member, University of Pune.

**Dr.R.G.Rasal**
Co-ordinator

**Dr.S.R.Walunj**
Principal

**• Venue : Seminar Hall, Library Building**

Indian Journal of Management Review
Special Issue August 2013
ISSN 0976-9056

# CONTENTS


| Sr No | Title of the Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | महाराष्ट्रातील पीक उत्पादकता व पीक रचनेतील बदलते प्रवाह | प्रा. डॉ.एस.एम.भोसले,<br>प्रा. एस.एल जाधव, | 259 |
| 2. | भारतीय अर्थव्यवस्थेपुढील कृषी विकासाच्या समस्येवरील नद्याजोड प्रकल्प शाश्वत उपाय | प्रा.डॉ.संभाजी भाऊराव काळे | 261 |
| 3. | भारतातील दुग्धव्यवसाय संशोधन व विकास संस्थांपुढील आव्हाने | श्री. डी. बी. घोटेकर<br>प्राचार्य डॉ. एस. के. झावरे | 262 |
| 4. | भारतीय फलोत्पादन : सद्यस्थीती | डॉ. सुहास आव्हाड,<br>प्रा. होनश्री यशवंत पाटील | 265 |
| 5. | भारतातील बटाटा उत्पादनाची प्रगती आणि आव्हाने | प्रा. मनिषा अनिरूध्द खुटवड | 266 |
| 6. | भारतीय शेतीची उत्पादकता | प्रा. पवार डी. पी. | 268 |
| 7. | भारतीय कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने | प्रा.साबळे एन. एस.<br>प्रा. कुसमुडे एम. जी. | 270 |
| 8. | भारतातील शेतमालाची उत्पादकता | डॉ. बी. आर. आदिक<br>प्रा. बी. जी. तुपे | 272 |
| 9. | पुणे व नाशिक प्रशासकिय विभागात प्रमुख अन्नधान्य पिक लागवडीखालील क्षेत्रफळात झालेल्या बदलाचा तुलनात्मक अभ्यास | प्रा. जयश्री सिनगर | 274 |
| 10. | महाराष्ट्रातील वीजेचे अर्थशास्त्र | प्रा.कावळे श्रीमंत तुकाराम<br>कु.महादेवी व्ही.फड | 276 |
| 11. | भारतातील पायाभूत संरचना | प्राचार्य डॉ. डी. एस. पाटील | 277 |
| 12. | भारतातील अन्न सुरक्षितता आणि सार्वजनिक वितरण प्रणाली" | प्रा. दिपक कारे | 279 |
| 13. | भारतीय अर्थव्यवस्थेपुढील दारिद्रयाचे आव्हान | प्रा.मोहन शिंदे | 280 |
| 14. | कृषी व संलग्न सेवा विकास योजनांतर्गत आदिवासींसाठी राबविलेल्या योजनांचे मूल्यमापनात्मक अध्ययन | डॉ.आर.के.दातीर,<br>प्रा.अमोल गायकवाड | 281 |
| 15. | भारतीय रुपयाचे घसरते मूल्य : एक समस्या | डॉ. के. के. पाटील<br>डॉ. प्रसन्नजीत रा. गवई | 284 |
| 16. | भारतीय अर्थव्यवस्थेतील भाववाढ कारणे परिणाम व उपाययोजा | प्रा. पुंड व्ही. पी. | 286 |
| 17. | भारतीय बँकिंग क्षेत्रापुढील आव्हानात्मक परिस्थितीतही स्टेट बँक ऑफ इंडियाची देदीप्यमान प्रगती | डॉ. के.के. पाटील<br>प्रा.डी.डी. भोसले, | 287 |
| 18. | भारताची वाढती लोकसंख्या | प्रा. डॉ. टी. एल. बारबोले | 289 |
| 19. | भारतीय अर्थव्यवस्थेपुढील प्रमुख समस्या - दारिद्रय | प्रा. शिंदे एस. एस.<br>डॉ.बी.एन.सापनर, | 290 |
| 20. | भारतीय कृषिप्रधान अर्थव्यवस्था आणि बेकारी | प्रा.डॉ. ए.टी. तवार<br>डॉ. ए. बी. निर्मळ | 292 |
| 21. | भारतीय अर्थव्यवरथेसमोरील - दारिद्र एक आव्हान | देशमुख अश्विनी हरिश्चंद्र<br>प्रा.डॉ.चव्हाण सीमा राजेंद्र | 294 |
| 22. | दारिद्रय : एक दृष्टीक्षेप | प्रा.श्रीमती आहेर मनिषा | 296 |

Indian Journal of Management Review
Special Issue August 2013
ISSN 0976-9056

२. शेती विकासासाठी सरकारने योजनांच्या माध्यमातून पुरेशा प्रमाणात आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे.
३. पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतीच्या उत्पादनातही अनिश्चितता येते. ही समस्या दूर करण्यासाठी कृत्रिम पाणीपुरवठ याच्या सोयी उपलब्ध असणे आवश्यक आहे.
४. नवीन तंत्राची जाणीव निर्माण करून ते स्वीकारण्याची आर्थिक क्षमता आपल्या कास्तकारांमध्ये यायला हवी.
५. कृषी विकासाच्या धोरणांच्या केंद्रस्थानी सीमांत आणि लहान शेतकरी असणे काळाची गरज आहे.

संदर्भ सूची :-


1. Ministry of agriculture, annual report ( 1994 -95).
2. Agricultural statistics at a glance 2007, 2008, 2010 .
3. Datta & Sundharam, Indian Economy ,2012.
4. Economic survey 2004 – 05, 2006 – 07.
5. Planning Commission, Various five – year plan Documents.
6. Eleventh five year plan 2007 – 12 .


# भारतातील शेतमालाची उत्पादकता

**डॉ. बी. आर. आदिक**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

**प्रा. बी. जी. तुपे**
व्याख्याता,
सी. डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

- **प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश असून या देशातील ५९.१० टक्के लोक शेती व्यवसाय करतात ६५ टक्के लोकांना शेती व्यवसायातून रोजगार मिळतो. सन २०१२-१३ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा १३ टक्के राहिला आहे. तो दर इतर क्षेत्रांपेक्षाही जास्त आहे. भारतात १९६३ मध्ये श्री राजकृष्ण यांनी आपल्या लेखात भारतात कृषी किंमत विषयक धोरणात बदल करणे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीची उत्पादकता वाढवणे. संशोधन पेपरमध्ये भारतातील अन्नधान्याची उत्पादकता विषयी विश्लेषण करणे. प्रत्येक राज्यातील उत्पादकतेचा अभ्यास करणे. शेतमालाच्या उत्पादकतेचा शेतमालाच्या आधारभूत किंमतीवर कसा परिणाम होतो त्या विषयी अभ्यास करणे. उत्पादकतेच्या समस्यांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविणे.

- **अभ्यासाची उद्दिष्टे :**

१. भारतातील शेतमालाच्या उत्पादनाची इतर देशातील पिकांच्या दर हेक्टरी उत्पादनाचा अभ्यास करणे.
२. राज्यातील शेतमालाच्या उत्पादनाच्या व उत्पादकतेचा अभ्यास करणे.
३. राज्याराज्यातील शेतमालाच्या उत्पादनाचा व उत्पादकतेचा शेतमालाच्या आधारभूत किंमतीच्या परिणामांचा अभ्यास करणे.
४. शेतमालाच्या अन्नधान्याच्या उत्पादन व उत्पादकतेच्या समस्यांचा अभ्यास करणे.

- **संशोधन पध्दती :**

संशोधन पेपर हा दुय्यम स्रोताच्या साहाय्याने विश्लेषण केले आहे. त्यामध्ये संदर्भ पुस्तके, अहवाल, मासिके, वृत्तपत्रे, लेख व वेबसाईट यांचा वापर केला आहे.

- **भारतातील शेतमालाची उत्पादकता इतर देशांशी तुलना :**

भारतातील शेतमालाची उत्पादन व उत्पादकतेचा अभ्यास करतांना इतर देशाच्या शेतमालाच्या उत्पादन व उत्पादकतेविषयी अभ्यास केला आहे. भारतातील शेतमालाच्या उत्पादनामध्ये गहू, ज्वारी, बाजरी, तांदुळ, मका, शेंगदाणे या पिकांचा समावेश केला आहे. भारताची शेतमालाची उत्पादकता प्रति हेक्टर किती आहे व इतर देशाची किती आहे याची तुलना पुढील कोष्टकात केली आहे.

**शेतमालाची उत्पादकता प्रति हेक्टर**

| देश | तांदूळ | गहू | मका | शेंगदाणे | ऊस |
|---|---|---|---|---|---|
| चीन | ६,०७४ | ३,९०७ | ४,८५४ | २,६२४ | ६९,५५६ |
| जापान | ५,८५९ | -- | -- | २,३०८ | -- |
| अमेरिका | ७,४४८ | २,९७४ | ८,९२४ | ३,५४० | ७७,५१५ |
| कॅनडा | -- | २,२५० | ७,८१९ | -- | -- |
| इंडोनेशीया | ४५३ | -- | ३,२५२ | २,०१६ | -- |
| व्हिएतनाम | ४,६३४ | -- | -- | १,६६७ | -- |
| जग | ३,८३७ | २,६६५ | ४,४७२ | १,३४७ | ६५,२९३ |
| भारत | ३,००० | २,६१७ | १,११४ | २३८ | ३२,८५९ |

स्रोत : *Agriculture Statistics at a glance* २००६ *Government of India*

वरील कोष्टकावरून स्पष्ट होते की, सर्व प्रमुख पिकांमध्ये भारताची उत्पादकता जगाच्या सरासरीपेक्षा कमी आहे आणि त्या त्या पिकाच्या प्रमुख उत्पादव देशाच्या तुलनेत तर फारच कमी आहे.

**भारतातील राज्यातील अन्न-धान्याचे उत्पादन :**

भारतातील शेतमालाची उत्पादकता सरासरी दर हेक्टरी किती आहे. प्रत्येक राज्यासाठी शेतमालाची उत्पादकता भिन्न भिन्न आहे. अन्नधान्य उत्पादकता काढण्याचे सूत्र पुढील प्रमाणे -

सूत्र : अन्नधान्य उत्पादकता = एकुण अन्नधान्य उत्पादन प्रति क्विंटल / एकुण पिकाखालील क्षेत्र प्रति हेक्टर

भौगोलिक प्रदेशाप्रमाणे राज्याची सरासरी उत्पादकता दर हेक्टरी

| अ.नं. | उत्पादकता | दर हेक्टरी उत्पादकता | राज्य |
|---|---|---|---|
| १. | अतिउच्च उत्पादकता | २७०० पेक्षा अधिक | पंजाब, हरियाणा |
| २. | उच्च उत्पादकता | २२०० ते २७०० | गोवा, पश्चिम बंगाल, त्रिपूरा, मणिपूर, आंध्रप्रदेश |
| ३. | मध्यम उत्पादकता | १७०० ते २२०० | केरळ, उत्तर प्रदेश, तामिळनाडू, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड |
| ४. | कमी उत्पादकता | १२०० ते १७०० | मेघालय, जम्मू काश्मिर, बिहार, नागालँड, मिझोराम, आसाम, गुजरात, राजस्थान, झारखंड, कर्नाटक, सिक्कीम, ओरिसा, अरूणाचल प्रदेश |
| ५. | अति कमी उत्पादकता | १२०० पेक्षा कमी | मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र |

१. **अतिउच्च उत्पादकता राज्ये :** भारतातील अति उच्च उत्पादकतेमध्ये पंजाब आणि हरियाणा या दोन राज्यांची दर हेक्टरी उत्पादकता जास्त आहे. गहू, तांदूळ ही मुख्य पिके घेतली जातात. या राज्यामध्ये विहीर, कॅनॉल, वीज, रस्ते यांची उपलब्धता मोठया प्रमाणात आहे.

२. **उच्च उत्पादकता राज्ये :** अन्नधान्याची उच्च उत्पादकता असणारे पाच राज्य आहेत. गोवा, पश्चिम बंगाल, त्रिपूरा, मणिपूर व आंध्रप्रदेश या राज्यांचा समावेश होतो. या राज्यांमध्ये मका, गहू, तांदूळ ही पिके घेतली जातात.

३. **मध्यम उत्पादकता राज्ये :** यामध्ये केरळ, उत्तर प्रदेश, तामिळनाडू, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड ही राज्ये येतात. या राज्यांना सर्वसाधारण व चांगल्या स्वरूपाचा पाऊस पडतो. या राज्यात मिश्र पिके घेतली जातात.

४. **कमी उत्पादकता राज्ये :** यामध्ये मेघालय, जम्मू काश्मिर, बिहार, नागालँड, मिझोराम, आसाम, गुजरात, राजस्थान, झारखंड, कर्नाटक, सिक्कीम, ओरिसा व अरूणाचल प्रदेश या राज्यांचा समावेश होतो. या राज्यांची सरासरी उत्पादकता खूप कमी आहे कारण या राज्यांत पावसाचे प्रमाण खूप कमी आहे.

५. **अति कमी उत्पादकता :** यामध्ये मध्य प्रदेश, छत्तीसगड व महाराष्ट्र ही राज्ये येतात. या राज्यांची उत्पादकता खूप कमी आहे.

१. १९९६ ते २००५ या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या शेतमाल भाव समितीच्या कार्यपध्दतीनुसार गहू, ज्वारी, मूग व सूर्यफुल या पिकांचा उत्पादन खर्च हा केंद्र शासनाच्या कार्यपध्दतीपेक्षा ३५ ते ५५ टक्के जास्त येतो. त्यामुळे केंद्र शासनाच्या कार्यपध्दतीनुसार येणा-या उत्पादन खर्चाच्या ४५ ते ६५ टक्के एवढा हमी भाव मिळतो.

२. हरभरा, तांदुळ, कापूस, भुईमूग, तूर व सोयाबीन या पिकांसाठी केंद्र शासनाच्या उत्पादन खर्चाच्या ४५ ते ७२ टक्के हमी भाव मिळतो.

३. ऊस पिकाच्या बाबतीत मात्र केंद्र शासनाच्या हमी किंमतीच्या ७५ ते ९० टक्के हमी भाव मिळतो.

कापूस या पिकाचे उत्पादन, उत्पादन खर्च व किमान आधारभूत किंमत (क्विंटल हेक्टरी)

| राज्य | प्रति क्विंटल खर्च रू. | उत्पादन किलोमध्ये | एम.एस.पी. (लहान धाग्याचा कापूस) २८०० रू. | एम.एस.पी. (मोठया धाग्याचा कापूस) ३३०० रू. |
|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | २,५७९ | -- | ८.६ | ७४.४ |
| गुजरात | २,२१६ | ६५० | २६.३ | ९७.१ |
| हरियाणा | २,६५० | -- | ५.६ | ६५.५ |
| कर्नाटक | २,६३३ | -- | ५.१ | ५३.० |
| उत्तरप्रदेश | २,५३६ | -- | १०.४ | ८३.२ |
| महाराष्ट्र | २,९६० | ३३२ | -५.४ | ३४.२ |
| पंजाब | २,३९६ | १३०० | १६.८ | १००.३ |
| राजस्थान | १,९६६ | -- | ४२.४ | १२४.२ |
| तामिळनाडू | ३,०७६ | -- | -९.० | २६.३ |

(Note - For more details readers are advised to see the CACP's Discussion Paper on Pricing "Crisis" in Cotton by Ashok Gulati and Surabhi Jain, Dec. २०११)

१. महाराष्ट्र राज्याचे दर हेक्टरी उत्पादन ३३२ किलोग्रॅम आहे. तर गुजरात व पंजाब राज्याचे दर हेक्टरी उत्पादन ६५० व १३०० किलोग्रॅम आहे. म्हणून इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्र राज्याची दर हेक्टरी उत्पादन क्षमता कमी आहे.

२. महाराष्ट्र राज्याच्या कापसाचा एक क्विंटलचा खर्च २९६० रू. आहे. तामिळनाडूचा ३०७६ रू. प्रति क्विंटल खर्च आहे. तर गुजरात व राजस्थानचा उत्पादन खर्च इतर राज्यांपेक्षा कमी आहे. तो २२१६ व १९६६ रू. आहे.

 ISSN 0976-9056

३. सन २०११-१२ मध्ये लहान किंवा आखुड धाग्याच्या कापसाला २८०० रू. प्रति क्विंटल हमी भाव दिला तर महाराष्ट्र व तामिळनाडूचा एका क्विंटलचा खर्च जास्त असल्यामुळे व उत्पादन दर हेक्टरी कमी असल्यामुळे आधारभूत किंमत उत्पादन खर्चापेक्षा -५.४ टक्के व -९.० टक्के इतकी कमी मिळते त्यामुळे या राज्यातील शेतक-यांना शेतमालाच्या उत्पादन खर्चापेक्षा कमी किंमत मिळते.

४. लांब धाग्याच्या कापसाला ३३०० रू. प्रति क्विंटल आधारभूत किंमत जाहीर केली तर महाराष्ट्र व तामिळनाडू राज्यांना ३४.२ टक्के व २६.६ टक्के आधारभूत किंमत मिळते. तर इतर राज्यांना पंजाब व राजस्थान राज्यांना १०० व १२४ टक्के किंमत मिळते.

- **निष्कर्ष :**

१. भारतातील क्रुषीमालाची उत्पादकता इतर देशांपेक्षा कमी आहे.
२. राज्याराज्यातील शेतमालाची उत्पादकता भिन्न भिन्न आहे.
३. पंजाब, हरियाणा या राज्यांची उत्पादकता अति उच्च आहे. तर मध्य प्रदेश, छत्तीसगड व महाराष्ट्र राज्याची अति कमी उत्पादकता आहे.
४. सोयाबीन या पिकाची उत्पादकता महाराष्ट्रात सर्वात जास्त आहे तर भारतातील उत्पादकतेपेक्षाही ती जास्त आहे. इतर पिकांची उत्पादकता भारतातील उत्पादकतेपेक्षा कमी आहे.
५. महाराष्ट्रातील शेतमालाचा उत्पादन खर्च इतर राज्यांच्या तुलनेत जास्त आहे त्यामुळे किमान आधारभूत किंमतीपेक्षा तो जास्त असतो.
६. महाराष्ट्रातील शेतमालाची उत्पादकता वाढवण्यात अनेक समस्या आहेत.

- **उपाययोजना :**

१. खाजगी गुंतवणूकीला क्रुषी क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.
२. अवर्षण भागातील जमीन जास्तीत जास्त लागवडीखाली आणणे. हवामानातील बदलानुसार नवनवीन संकरित बियाणांचा वापर करणे.
३. सिंचनाच्या वापराबाबत काटकसर करणे व इस्त्राईलच्या शेतीचे अनुकरण करणे.
४. शेतमालाच्या आधारभूत किंमती केंद्रशासन जाहीर करते. परंतु काही राज्यांना फायदा होतो तर काही राज्यांना तोटा होतो. ज्या राज्यांना तोटा होतो त्या राज्यांना पॅकेज जाहीर करणे व तेवढा तोटा राज्य शासनाने अनुदानाच्या स्वरूपात देणे.
५. हवामानातील बदलानुसार नवनवीन बियाणांचे पैदास विद्यापीठाने निर्माण करावी.
६. शेती व्यवसायातील भांडवली तंत्रज्ञान कमी खर्चात उपलब्ध करून देणे.
७. इंद्रधनु हरित क्रांतीचा वापर लवकरात लवकर अमलात आणणे.

- **संदर्भ :**

१. Ruddhar Dutt, K. P. M. Sundharam (2011) Indian Economics, Published by S. Chand & Company Ltd.
२. The Indian Economic Journal (Dec. 2011) Challenges of Inclusive Growth.
३. R. L. Pitale (2007) India Rich Agriculture : Poor Farmers Income Policy for farmers.
४. Government of India Ministry of Agriculture National Commission on Farmers.
५. Swaminathan Committee on Farmers (Oct. 2006)
६. Economic Survey 2011-12
७. डॉ. डी. बी. यादव, उत्पादन खर्चावर आधारित किमान आधारभूत किंमती, महात्मा फुले क्रुषी विद्यापीठ, राहुरी.
८. Economics Times (24/12/2011) Spinning a Cotton Crisis Ashok Gulati, Chairman of the Commission for Agriculture Costs and Prices
९. डॉ. किरण जी. देसले, दीपस्तंभ इकॉनॉमिक्स
१०. डॉ. नरेंद्र जाधव, २७ जुलै २०११, शेतकरी आत्महत्या आणि क्रुषी क्षेत्रापुढील आव्हाने.

# पुणे व नाशिक प्रशासकिय विभागात प्रमुख अन्नधान्य पिक लागवडीखालील क्षेत्रफळात झालेल्या बदलाचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. जयश्री सिनगर**
**आर्टस् कॉमर्स अॅन्ड सायंन्स**

**प्रस्तावना :-**

भारतातील वाढतील लोकसंख्या शहरीकरण, वाढते औद्योगिकरण विषेश आर्थिक क्षेत्र (SEZ), अन्न धान्यांच्या व इतर पिकांच्या बदलत्या किमती इ. कारणामुळे अन्न सुरक्षेचा बहुचर्चित व्यापक प्रश्नामुळे प्रस्तुत अभ्यासास विशेष महत्व आहे. सदर अभ्यासात उपरोक्त नमुद केलेल्या प्रमुख अन्न धान्यांच्या पिकांच्या क्षेत्रफळात हरीत क्रांती पुर्व १९६० ते १९७० च्या दशकात, हरीत क्रांतीच्या १९७० ते १९८० च्या दशकात हरीत क्रांती नंतर १९८० ते १९९० च्या दशकात व जागतीकिरणाच्या १९९० ते २००० च्या दशकात झालेला बदल अभ्यासून अन्न सुरक्षेच्या प्रश्नावर उपाय शोधत असताना तयार करावयाच्या पिक आराखड्याकरीता या अभ्यासाचा उपयोग होईल.

**अभ्यासाची उदिष्टे :-**

१ पुणे व नाशिक प्रशासकिय विभागातील अन्न धान्य पिक लागवडीखालील क्षेत्रफळाच्या बदलाचा अभ्यास करणे.
२ अन्नधान्य पिक लागवडीखालील क्षेत्रफळाच्या बदलाचा दशक निहाय अभ्यास करणे.